# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# प्रादेशिक बातमीपत्र
# सकाळी 07 वाजून 10 मि

**दिनांकः21.12.2025** **वारःरविवार**

1. जागतिक स्तरावर टिकून राहण्यासाठीकौशल्य विकास, मनुष्यबळाची निर्मिती आणि संशोधनाची गरज-परराष्ट्र व्यवहारमंत्री डॉ एस जयशंकर यांचं प्रतिपादन
2. पुणे पुस्तक महोत्सवाची आज सांगता
3. राज्यातल्या  नगर परिषदा आणि नगर पंचायतींसाठी शांततेत मतदान-यासह आज दोन तारखेला झालेल्या मतदानाची मतमोजणी
4. माजी मंत्री डॉ. शालिनीताई पाटील यांचं काल मुंबईत निधन  आणि
5. 19 वर्षांखालील आशिया चषक क्रिकेट स्पर्धेत आज  भारत आणि पाकिस्तान संघात अंतिम लढत

**डॉ-एस-जयशंकर**

जागतिक पटलावर आता झपाट्याने बदल होत आहेत. सर्व स्तरावर होणाऱ्या जागतिक निकषांना पुरेसा होईल असा कौशल्य विकास, मनुष्यबळाची निर्मिती, स्वदेशी आरेखन, संशोधन, नवोन्मेष महत्वाचे असल्याचं परराष्ट्र व्यवहारमंत्री डॉ एस जयशंकर यांनी काल पुण्यात सांगितलं.

बदलत्या काळात टिकून राहण्यासाठी मेक इन इंडियावर भर देत आपले उत्पादने परकीय बाजारपेठांमध्ये पोहोचवण्यासाठी प्रयत्न करायला हवेत, परंतू केवळ बाजारपेठ म्हणून शिल्लक रहायचं नाही तर भारताला पुढच्या टप्प्यावर नेण्याची जबाबदारी तरुणांची आहे. अशी अपेक्षा परराष्ट्र व्यवहार मंत्री डॉक्टर एस शंकर यांनी काल पुण्यात सिंबायोसिस विद्यापीठाच्या पदवीदान समारंभात बोलताना व्यक्त केली.

**जयशंकर पुणे पुस्तक महोत्सव**

रामायण आणि महाभारत ही केवळ धार्मिक पुस्तकं नसून ती जागतिक राजकारणाचे धडे देणारी उत्तम मार्गदर्शक आहेत, असं प्रतिपादन परराष्ट्र मंत्री एस. जयशंकर यांनी पुणे पुस्तक महोत्सवातील व्याख्यानात काल केलं. भारताचं परराष्ट्र धोरण आता पाश्चात्य विचारांच्या पलीकडं जाऊन आपल्या सभ्यता आणि संस्कृतीवर असायला हवं. असंही ते म्हणाले.

**पुणे पुस्तक महोत्सव**

पुणे पुस्तक महोत्सवाला पुणेकरांचा उत्स्फूर्त आणि अभूतपूर्व प्रतिसाद मिळत असून, आतापर्यंत सुमारे सात लाखांपेक्षा अधिक नागरिकांनी भेट दिली आहे. आज या महोत्सवाची सांगता होणार आहे. रसिकांनी विविध विषयांवरील पुस्तकांची मोठ्या प्रमाणावर खरेदी केली.

या महोत्सवात, अटलजी : एक व्रतस्थ याज्ञिक या पुस्तकाचं प्रकाशन भाजपचे राष्ट्रीय महामंत्री विनोद तावडे यांच्या हस्ते करण्यात आलं.

**निवडणूक**

राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत 23 नगरपरिषदा आणि नगरपंचायतींमध्ये नगराध्यक्ष आणि नगरसेवकांच्या 143 पदांसाठी काल शांततेत मतदान झालं. दरम्यान, काल झालेल्या मतदानासह गेल्या दोन तारखेला झालेल्या मतदानाची मतमोजणी आज होणार आहे. यामतमोजणी प्रक्रियेसाठी प्रशासकीय यंत्रणा सज्ज झाली असून, सर्वत्र चोख पोलिस बंदोबस्त तैनात करण्यात आला आहे.

पुणे जिल्ह्यातील नगरपरिषद सार्वत्रिक निवडणुकीत एकंदर 63 पूर्णांक 2 टक्के तर सोलापूर जिल्ह्यात 68 पूर्णांक 8% मतदान झालं. नाशिक जिल्ह्यात 68 टक्के तर वाशिम जिल्ह्यात 63 पूर्णांक 50 टक्के मतदान झालं. रत्नागिरीत 49.78 टक्के मतदानाची नोंद झाली.

**महापालिका-निवडणूक**

बृहन्मुंबई महानगरपालिकेची आगामी निवडणूक काँग्रेस स्वबळावर लढणार आहे. काँग्रेसचे महाराष्ट्र प्रभारी रमेशचेन्नीथला यांनी काल मुंबईत वार्ताहर परिषदेत ही घोषणाकेली. सर्व 227 जागांवर लढायची काँग्रेसची तयारी असल्याचंते म्हणाले.

**शिवसंग्राम**

शिवसंग्राम पक्ष आगामी महानगरपालिका निवडणुका लढवणार असल्याचं पक्षाच्या अध्यक्षा डॉ.ज्योती विनायकराव मेटे यांनीसांगितलं आहे. लोकनेते विनायकराव मेटे विकास आघाडीच्यामाध्यमातून पक्ष निवडणूक लढणार असल्याची माहिती त्यांनीदिली. या संदर्भात मुंबई, नवी मुंबई, ठाणे, तसंच पुणे इथल्यापदाधिकाऱ्यांची बैठक झाली. त्यानंतर हा निर्णय जाहीरकरण्यात आला.

आगामी महानगरपालिका निवडणुकांमध्ये अजित पवार यांच्या पक्षासोबत आघाडी करायची किंवा नाही याचा अंतिम निर्णय सोमवार पर्यंत घेऊन अशी माहिती राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या खासदार सुप्रिया सुळे यांनी दिली आहे मुंबईत त्या वार्ताहरांशी बोलत होत्या

**भाजपा-प्रवेश**

उध्दव बाळासाहेब ठाकरे गटाचे कल्याण ग्रामीणचे माजी आमदार सुभाष भोईर, यांनी आपल्या असंख्य समर्थकांसह काल भारतीय जनता पार्टीमध्ये प्रवेश केला. ठाण्याच्या उबाठा गटातील पदाधिका-यांनीही भाजपामध्ये प्रवेश केला. भाजपा प्रदेशाध्यक्ष रविंद्र चव्हाण यांनी या सर्वांचे स्वागत केले.
पिंपरी चिंचवडचे माजी महापौर उबाठा गटाचे नेते संजोग वाघेरे पाटील, स्थायी समितीचे माजी अध्यक्ष राष्ट्रवादीचे प्रशांत शितोळे, नवनाथ जगताप यांच्यासह अनेक माजी नगरसेवकांनी आणि विविध पक्षातील कार्यकर्त्यांनी काल भारतीय जनता पार्टीमध्ये प्रवेश केला. भाजपा प्रदेशाध्यक्ष रविंद्र चव्हाण यांनी सर्वांचे पक्षात स्वागत केले.

**राष्ट्रीय-कला-उत्सव**

केंद्र सरकारच्या राष्ट्रीय शैक्षणिक संशोधन आणि प्रशिक्षण परिषदेच्या वतीने कालपासून पुण्यात अकराव्या राष्ट्रीय कला उत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. या महोत्सवात 37 राज्यातून 918 विद्यार्थी, 108 शिक्षक सहभागी झाले आहेत. एकूण बारा कला प्रकारांच्या स्पर्धा होत आहेत. दिव्यांगाना शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी केंद्रीय शिक्षा मंत्रालय विशेष प्रयत्न करत आहे यासाठी विशेष योजना राबवत आहे याविषयी अधिक माहिती देताना केंद्रीय शिक्षा संचालनालयाचे अतिरिक्त सचिव आनंद पाटील यांनी सांगितलं. ते म्हणाले....

**डिस्ट्रिक्ट कलेक्टर च्या लेव्हल ला एक कमिटी बनवून या एप च्या माध्यमातून कोणत्या डिसेबिलिटीज कोणत्या विभागामध्ये म्हणजे ब्लॉक मध्ये ताल्लुकमध्ये आहेत आणि त्या त्या वेळेला एक आठवड्यातून एक दिवस ते मुलांनी तिथं जावं आणि त्यांना ते सर्टिफिकेट मिळावं उडीआड कार्ड मिळणं फार गरजेचं आहे. बऱ्याचदा असं होतं की पॅरेंट्स जातात मुलं जातात आणि खूप कष्टानं पॅरेंट्स घेऊन जातात जिल्हा लेव्हल आणि तिथं डॉक्टर्स नसतात तर एक प्रॉपरली मॅनेज्ड सिस्टम आपण याच्यामध्ये आणण्याचा प्रयत्न केलेला आहे.**

**जर्मनी-शाळा-बुलडाणा**

बुवडाणा जिल्ह्यात जि.प.च्या प्राथमिक शाळेतील गणित भागाकार कार्ड वापराची जागतिक स्तरावर दखल घेतली आहे. जर्मनीतीतून शिक्षण क्षेत्रातील मान्यवर भारतात कदमापूर च्या जिल्हा परिषद शाळेतील विद्यार्थ्यांसाठी ऑनलाइन संवाद साधतात आणि मार्गदर्शन करतात. ऐकुया याविषयीची अधिक माहिती आमच्या प्रतिनिधींकडून.....

**विद्यार्थ्यांना गणित विषय म्हटला म्हटले की गुणाकार भागाकार यासह पाढे पाठ करताना अनेक शाळांमध्ये गणित म्हणजे भीती, मात्र खामगाव तालुक्यातील कदमापूर च्या जिल्हा परिषद मराठी उच्च प्राथमिक शाळेतील उपक्रमशील शिक्षक राजेश**

**कोगदे यांनी इयत्ता चौथीच्या विद्यार्थ्यांना 10 ते 15 सेकंदात गुणाकार, भागाकार, बेरीज-वजाबाकीची स्वतः पडताळणी करण्याचे कौशल्य शिकवले आहे. परिणामी विद्यार्थी आता गुरुजींवर अवलंबून नाहीत ते स्वतःच 'गणित गुरु' बनले आहेत**
**हा ग्लोबल टीचर पुरस्कार मिळालेल्या शिक्षकाच्या भागाकाराच्या पद्धत जागतिक स्तरावर पसंतीस उतरत आहे. शाळेमध्ये जर्मन भाषेचे ज्ञान मिळावे शाळेच्या इमारतीवर कदमापूर ते जर्मनी असा प्रवास दर्शवण्यात आला आहे, डिजिटल पेमेंटचे ज्ञान मिळावे यासाठी विद्यार्थ्यांनी आपल्या घरी खाऊ करिता मिळणाऱ्या पैशामधून डिजिटल बचत बँक कौशल्य विकास योजना सुरू केली.**
**आकाशवाणी बातम्यांसाठी सचिन ठाकरे यांच्यासह मंजुषा गायधनी, पुणे.**

**एनआयए**

राष्ट्रीय तपास संस्था अर्थात एनआयएने दिनेश पुसू गावडे हत्या प्रकरणात आणखी दोन फरार आरोपींना काल अटक केली. हे दोन्ही आरोपी बंदी घातलेल्या सीपीआय या माओवादी संघटनेचे सदस्य आहेत. नोव्हेंबर 2023 मध्ये गडचिरोली इथं दिनेश पुसू गावडे यांचे पोलिसांचा खबरी आणि राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचा सदस्य असल्याच्या संशयावरून सीपीआय च्या सदस्यांनी अपहरण करून हत्या केली होती.

**निधन-अजितपवार**

जेष्ठ माजी मंत्री डॉ. शालिनीताई पाटील यांचं काल मुंबईत निधन झालं. त्या 94 वर्षांच्या होत्या. उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी समाजमाध्यमावरील संदेशांत पाटील यांना श्रद्धांजलि अर्पण केली आहे. त्यांच्या निधनानं एक कर्तृत्ववान व्यक्तिमत्त्व हरपलं आहे असं पवार यांनी म्हटलं आहे.

शालिनीताईनी त्यांचे दिवंगत पती वसंतदादा पाटील यांना त्यांनी समाजकारणामध्ये खंबीर साथ दिली.
आज सकाळी 10 ते 11 या वेळेत मौजे सातारा रोड इथल्या चंद्रकांत वसंत दादा पाटील विद्यालयात त्यांचा पार्थिव देह अंत्यदर्शनासाठी ठेवण्यात येणार आहे.

**क्रिकेट**

19 वर्षांखालील आशिया चषक क्रिकेट स्पर्धेत आज भारत आणि पाकिस्तान संघात अंतिम लढत होणार आहे. दुबईत सकाळी साडे दहा वाजता सामन्याला सुरुवात होईल. या दोन्ही संघांनी काल उपांत्य फेरीचे सामने जिंकून अंतिम फेरीत धडक मारली.

**क्रिकेट संघ निवड**

निवड समितीचे अध्यक्ष अजित आगरकर यांच्या नेतृत्वाखालील वरिष्ठ राष्ट्रीय पुरुष निवड समितीने काल फेब्रुवारी महिन्यात भारत आणि श्रीलंका इथं होणा-या 20 षटकांच्या विश्वचषक स्पर्धेसाठी 15 सदस्यीय भारतीय संघ जाहीर केला आहे. शुभमन गिलला संघातून वगळण्यात आलं असून अक्षर पटेलकडे उपकर्णधारपद सोपवण्यात आलं आहे.

**हवामान**

नाशिक मध्ये काल पुन्हा 6 पुर्णांक 9 अंश सेल्सिअस इतक्या निच्चांकी तापमानाची नोंद झाली. निफाड मध्ये यंदाच्या हंगामातील सर्वात कमी म्हणजेच 4 पुर्णांक 5 अंश सेल्सिअस इतक्या किमान तापमानाची नोंद झाल्याची माहिती कुंदेवाडीतील कृषी संशोधन केंद्राने दिली आहे. आजही मध्य महाराष्ट्रात तुरळक ठिकाणी थंडीची लाट येण्याची शक्यतास हवामान विभागानं वर्तवली आहे.

# आकाशवाणी पुणे केंद्रावरच प्रादेशिक बातमीपत्र संपलं

# नमस्कार